ISSN 2394-5303

# Printing Area

Issue-41, Vol-05, May-2018

International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned by CamScanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research Journal | May 2018 Issue-41, Vol-05 | 01

UGC Approved
Jr.No.43053

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

May 2018, Issue-41, Vol-05

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

14) DEVELOPINING E-LEARNING COMPETENCIES AMONG TEACHERS
Swangi || 55

15) e-Governance initiative of Maharashtra : A Study
Dr. Atul D. Wankhade || 59

16) आद्यक्रांतीकारक उमाजी नाईक
प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले || 62

17) शिक्षक शिक्षणाच्या कार्यक्रमात अध्ययन व अध्यापन कौशल्याची गरज
डॉ. मच्छिंद्र रामचंद्र गोटे || 64

18) "समकालीन राजकीय सत्ता संघर्षाचे चित्रण करणारी कादंबरी : नामदार श्रीमती"
प्रा.डॉ.यशवंत आश्रुबा हाके || 69

19) अंबाजोगाई येथील अमृतेश्वर (अमलेश्वर) मंदिर-एक दृष्टिक्षेप
प्रा. डॉ. कदम एस.आर. || 73

20) संगीत, संपादन प्रेरणा आणि लिंग घटकाचा सृजनशीलतेवर होणारा परिणाम
डॉ. गजानन रमेशराव रत्नपारखी || 76

21) संत जनाबाईच्या अभंगातील लोकजीवन
प्रा.केशव धोंडिबा टिपरसे || 82

22) भारतीय जातिव्यवस्था आणि कोल्हाटी जमात
सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार || 84

23) ग्रामिण भागातील कला महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या ......
प्रा. मोहन शशीकांत रतकंठीवार || 89

24) भारतातील चलनवाढीची प्रवृत्ती
प्रा. डॉ. मधुकर एस. ताकतोडे || 93

25) ई लर्निंग एक उपयुक्त साधन
कु. जया डब्लु. वागदे, || 97

26) आधुनिक महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचा विकास
प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे || 99

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

Studio मधील व्यक्ती आपल्याला पाहु शकत नाहीत. पण आपण त्याना पाहु शकतो म्हणुन हा One Way Way Video आहे व दोघेही एकमेकांशी संपर्क साधतात म्हणुन Two Way Audio आहे.

ई लर्निंगची काही यशस्वी उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत.

1 ipM eQr online वर्ग Massive Open Online Class गेल्या २ ते ३ वर्षात प्रचंड लोकप्रिय झालेला नवविचार उदा. academicearht.org

२ मुक्त शिकण्याची संसाधने

शैक्षणिक साहित्य मुक्त असावे त्याच्या वापरावर कुठलेही बंधन नसावे असे मानणारा नवविचार. उदा. nptel-iitm.ac.in

३ इतर शिकण्याची संसाधणे

जगातील सर्व विषयावरील वेगवेगळया शिक्षकांच्या व्हिडीओ व्याख्यांनाचा सर्वात मोठा खजिना. उदा. youtube.com

निष्कर्ष :

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ई लर्निंग हा महत्वाचा घटक असुन भोगौलिकदृष्टया दुरस्थ असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता उपग्रहाद्वारे माहिती इंटरनेटच्या माध्यमातुन पोहचविणे आणि स्वयंअध्ययनाला प्रोत्साहीत करणे हा ई लर्निनचा भाग आहे.

संदर्भसुची

1 http://cec.nic.in/edusat/page Access dated 13/04/2018

2 http://mr.m.wikipedia.org Access dated 14/04/2018

३ भिरज, कोकांडे, “ई अध्ययन” National Seminar On Innovative Practices in Library and Information Services date 4 Nov. 2015

❑❑❑

**26**

# आधुनिक महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचा विकास

**प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे**
संशोधक विद्यार्थी
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.

**********

समाजपरिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करताना परंपरागत अवस्थेतून आधुनिकतेकडे जावे लागते. सामाजिक परिवर्तनातील महत्वाचा घटक म्हणजे समाजामधील महिलांच्या स्थितीमधील परिवर्तन होय. महिलांच्या समस्या व परिस्थितीमध्ये होणारे विधायक परिवर्तन हे समाजविकासासाठी उपयुक्त ठरणारे असते. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे माध्यम म्हणून मान्य करत असताना या परिवर्तनाचा आधार हा महिलांच्या शिक्षणातून घडणारे परिवर्तन हा आहे हे विसरता येणार नाही. स्त्री शिक्षणाची वाटचाल समजून घेत असताना प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील स्त्री जीवनाची व तिच्या शिक्षणाची पार्श्वभूमी समजून घेणे गरजेचे आहे.

**स्त्री शिक्षणाची पार्श्वभूमी :—**

प्राचीन भारतीय इतिहासाची मांडणी करत असताना राष्ट्रवादी इतिहासकारांनी प्रामुख्याने पूर्व वैदिक कालखंड, गुप्तांचा सुवर्णयुगी कालखंडातील स्त्रीयांच्या प्रगत अवस्थेचे वर्णन केलेले आहे. त्यासाठी गार्गी, मैत्रियी सारख्या एखाद — दुस—या उदाहरणाची पुष्टीही केलेली दिसून येते. ब्रिटीश इतिहासकारांनी आपल्या इतिहासलेखनात भारतातील स्त्रीयांची परिस्थिती, बालविवाह, स्त्री—भ्रूणहत्या, सतीप्रथा विधवांची हालाखीची परिस्थिती, स्त्री शिक्षणावर असणारी बंदी यासारख्या भारतीय दुरावस्थेविरूद्ध जी मते मांडली त्यातून त्यांना प्रत्युत्तर म्हणून भारतीय संस्कृतीचे उदात्तीकरण करण्याच्या हेतूने भारतातील राष्ट्रवादी इतिहासकारांनी मांडलेला वरील सर्व प्रयास होता.



Scanned by CamScanner

भारतीय संस्कृती कशी महान आहे, सर्वसमावेशक आहे हे सांगताना मात्र महिलांच्या ख–या प्रश्नाकडे इतिहासकारांकडून नेहमीच उपेक्षा झाली. अद्यापपावेतो हाच इतिहास सांगून समाधान व्यक्त करण्याकडे कल असल्याचे दिसून येते. वास्तविक गार्गी आणि याज्ञवल्क्य यांच्यात झालेल्या वादविवादात निरूत्तर झालेला याज्ञवल्क्य 'आता तुझे तोंड बंद कर नाहीतर ते धडावेगळे करीन' अशी धमकी देवून गार्गीला गप्प बसवतो. याचा अर्थ महिलांना शिक्षणाचा हक्क नव्हताच. हिंदूंमध्ये प्रमाण मानली गेलेली मनुस्मृतीही स्त्रिया व शुद्रांना शिक्षणाचा अधिकार स्पष्टपणे नाकारते. मनुच्या मते स्त्रीला गुरूकुलात शिक्षण घेण्याची गरज नाही. लग्न विधी हाच तिच्यासाठी ज्ञानाचा मंत्रविधी आहे. त्याकाळात शिक्षणाचे औपचारिक स्वरूपाचे केंद्र मानले गेलेल्या गुरूकुलात स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नव्हता. महिलांना ज्ञानभाषेपासून जाणीवपुर्वक दूर ठेवले गेले. विधवेने परजातीय पुरूषाशी विवाह करू नये म्हणून सतीप्रथा, विधवा विवाह बंदी या सारख्या प्रथा अस्तित्वात आल्या. त्या निमूटपणे पाळण्यासाठी ज्ञानबंदी अर्थात शिक्षणावर बंदी आणली गेली. शतकानुशतके भारतीय स्त्री गृहकृत्ये, पतिसेवा, मुलांचे संगोपन, व्रतवैकल्ये या तिच्या माथी मारलेल्या परंपरांमध्ये गुरफटत गेली. लेखन वाचनाशी संबंध नसल्यामुळे बाहेरील जगात पाऊल टाकण्याची कल्पनाही तिला करता आली नाही.

ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतात स्त्रीयांना शिक्षणाचा थोडाफार अवकाश प्राप्त झाला. या काळात ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी स्त्री–शुद्रांसाठी शाळा सुरू केल्या. १८२४ मध्ये ख्रिश्चन धर्मगुरूंनी मुंबईमध्ये मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली. भारतातील वंचित घटक म्हणून राहिलेल्या स्त्रीला बालविवाह, भ्रूणहत्या, सतीप्रथा, विधवा विवाहावर लादण्यात आलेली बंदी, व्रतवैकल्याची सक्ती या मध्ये अडकलेले पाहून भारतीय समाज रानटी, असंस्कृत, अमानवी असल्याची टीका नेहमीच इंग्रज अधिका–यांकडून आणि विचारवंतांकडून होत गेली. यातूनच हा भारतीय संस्कृती व पुरूषार्थावरील हल्ला समजून सुरूवातीच्या काळात नव्याने उदयाला येत असलेल्या उच्च शिक्षित मध्यमवर्गीयांना स्त्री विषयक सुधारणांची गरज वाटली. प्रबोधनकाळात अनेक विचारवंतांची, समाजसुधारकांची मते स्त्री शिक्षणाच्या अवलंबासाठी अनुकूल झाली.

भारतीय स्त्रीयांच्या शिक्षणासाठी सुरूवातीला इंग्रजांनी 'जनाना' शिक्षणव्यवस्थेचा अवलंब केला. प्रारंभीच्या काळात उच्चभ्रू वर्गाकडून स्त्री शिक्षणास असलेल्या विरोधामुळे इंग्रज ख्रिश्चन मिशन–यांनी केलेला हा प्रयत्न होता. यामध्ये मिशनरी महिला जनान अर्थात आंतरमहालात शिक्षण देत असत. यामध्ये प्रामुख्याने भरतकाम, गायन, गृहकौशल्य या बाबी शिकविल्या जात.

**महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची दिशा :–**

महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाची व्यवस्था कशी असावी याबाबतीत प्रामुख्याने दोन विचारप्रवाह समोर येतात. अभिजन सुधारणावाद्यांच्या मते, स्त्रियांची व पुरूषांची कार्यक्षेत्रे समान नाहीत, त्यामुळे त्यांना समान शिक्षण देण्यात येवू नये. स्त्रीचे मुख्य कार्यक्षेत्र कुटुंब असल्याने तिला गृहिणीचे शिक्षण देण्यात यावे. तर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मांडलेल्या सत्यशोधक विचारप्रवाहाने स्त्रियांनाही समान शिक्षणाचा पुरस्कार केला. महात्मा फुलेंनी दास्यमुक्तीसाठी शिक्षण हेच साधन मानले होते.

१८२४ मध्ये मुंबईमध्ये स्थापन झालेल्या शाळेनंतर सरकार आणि समाजसुधारक या दोघांच्याही पातळीवर स्त्री शिक्षण प्रसाराचे मोठया प्रमाणात कार्य झाले. १८७६ ते १९५० या कालखंडात मुंबईत तसेच इतर ठिकाणी वेगवेगळ्या भाषांमधून शिक्षण देणा–या शाळांची स्थापना केली गेली. १८३५ नंतर भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणात झाला. १८५४ मध्ये लॉर्ड डलहौसीच्या काळातील वुड आयोग या शिक्षण आयोगानेही महिलांच्या शिक्षणाबाबत महत्वपूर्ण विचार मांडले. हंडर आयोगाने मुलींच्या शिक्षणासाठी शुल्क घेतले जावू नये, स्त्री शिक्षकांच्या नेमणूका कराव्यात, स्त्रीयांच्या शिक्षणाचा विचार करून अभ्यासक्रम सोपा ठेवावा, मुलींसाठी स्वतंत्र शाळा असावी, अभ्यासक्रमामध्ये व्यवहारोपयोगी विषय ठेवावेत. पडदा पध्दतीमुळे घरी राहणा–या मुलींसाठी घरी शिक्षिका पाठविण्याची सोय करावी. यासारख्या शिफारशी केल्या. तर १९०४ मध्ये लॉर्ड कर्झनच्या काळातील शिक्षणाचे



Scanned by CamScanner

केलेले केंद्रिकरण, तसेच १९०४ चा विश्वविद्यालय कायदा यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये झपाट्याने बदल होत गेले. १९१७ मध्ये नेमलेल्या सॅडलर कमिशनने देखिल स्त्री शिक्षणावर विशेष भर दिलेला दिसून येतो. मुलींना वयाच्या १५ व्या व १६ व्या वर्षापासून परदास्कूल स्थापन करावे. स्त्री शिक्षणासाठी स्वतंत्र मंडळ असावे व स्वतंत्र अभ्यासक्रम असावा. पडदापध्दत नसलेल्या ठिकाणी सहशिक्षणाला उत्तेजन दयावे. प्रशिक्षित शिक्षिका निर्माण कराव्यात. आरोग्य शिक्षणाची व्यवस्था करावी. विद्यापीठामध्ये स्त्री शिक्षण परिषद स्थापन करण्यात यावी. आणि त्यामार्फत शिक्षिकांना प्रशिक्षण देण्यात यावे. यासारख्या शिफारशी या आयोगाने केल्या. १८७० पासून मुलींच्या शाळा संख्येने मोठया प्रमाणात वाढल्या. त्यातूनच उच्च शिक्षणाकडेही मुलींचा सहभाग वाढत गेला. १८८८ मध्ये कॉर्नेलिया सोराबजी ही पहिली पदवीधर महिला आणि त्याचबरोबर पहिली स्त्री वकील ठरली. १८८३ मध्ये बॉम्बे युनिव्हर्सिटीने स्त्रीयांसाठी प्रवेश खुला केला.

### महाराष्ट्रातील स्त्री शिक्षण विषयक समाज सुधारकांचे योगदान

उच्चभ्रू वर्गातील स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून त्या दिशेने वाटचाल करणा—या व्यक्ती तसेच संस्था १८ व्या व १९ व्या शतकात पुढे आलेल्या दिसून येतात. मात्र मध्यम, कनिष्ठ व अस्पश्श्य वर्गातील स्त्रीयांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे महत्वाचे कार्य महाराष्ट्रात जर कोणी केले असेल तर ते महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाईंनी. स्त्री शूद्रातिशूद्रांची मुक्ती शिक्षणातूनच होऊ शकेल याची फुले दांपत्याला खात्री होती. १८४८ मध्ये पुण्यात मुलींची पहिली शाळा स्थापन करून त्यांनी शिक्षणाची दारे महिलांसाठी खुली केली. आधुनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य देखिल महत्वाचे आहे. धोंडो केशव कर्वे यांनी नथुबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाची अर्थात एस.एन.डी.टी. विद्यापीठाची स्थापना खास महिलांसाठीच केली. १८९६ मध्ये त्यांनी अनाथ बालिकाश्रम मंडळीची स्थापना करून स्त्री शिक्षणाचे कार्य पुढे चालविले. १८८४ मध्ये न्या. रानडे, भांडारकर या समाजसुधारकांनी पुण्यात मुलींसाठी हायस्कूलची स्थापना केली. आगरकरांनी याच कालखंडात मुलींना फक्त लिहिता वाचता येणे तेरीज—बेरीज येणे एवढेच न शिकवता मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रीकच्या परिक्षेला आवश्यक आहेत ते सर्व विषय शिकवावेत असे जोरदार प्रतिपादन केले. प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी संपूर्णपणे सरकारने उचलावी व ते सक्तीचे करावे या गोष्टींचा प्रचार होत असताना आगरकर मुलींच्या शिक्षणाबाबतही सक्ती केली पाहिजे, किंबहुना मुलींच्या शिकण्याबद्दल थोडीशी अधिकच केली पाहिजे असे म्हणत होते. या थोर विचारवंतांबरोबर मुक्ता साळ्वे, ताराबाई मोडक, पंडीता रमाबाई यांचे कार्यदेखिल महिलांच्या शिक्षणासाठी अनन्य साधारण आहे. पंडीता रमाबाई यांनी १८८९ मध्ये विधवा व कुमारिकांसाठी शारदा सदन ही शाळा सुरू केली.

### स्वातंत्र्योत्तर काळातील महिला शिक्षणाची वाटचाल

स्वातत्र्योत्तर कालखंडात भारतीय शिक्षणव्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल होत गेले या बदलांचा परिणाम स्त्री शिक्षणावर झालेला दिसून येतो. भारतीय राज्यघटनेत समानतेच्या तत्वांचा अवलंब केला. राज्यघटनेच्या कलम ४५ नुसार १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुलामुलींना मोफत शिक्षण देण्यात यावे हे तत्व स्विकारले आहे. कलम १५ नुसार सरकार स्त्रीया आणि मुलींच्या विकासासंदर्भात विशेष तरतुद आणि कार्ययोजना राबवू शकते. याबाबींचा समावेश करण्यात आला आहे. नंतरच्या काळात भारतीय शिक्षणाचा विकास करण्यासाठी भारत सरकारने वेळोवेळी विविध आयोग आणि समित्यांची स्थापना केली. या आयोग आणि समित्यांनी महिला शिक्षणाच्या संदर्भात आपले विचार मांडून महिला शिक्षणाला गती देण्याचे कार्य केले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शिक्षणासाठी सर्वप्रथम स्थापन केलेला आयोग म्हणजे १९४८ चा भारतीय विद्यापीठ आयोग होय. डॉ.राधाकृष्णन अध्यक्ष असलेल्या या आयोगाने स्त्रियांना वेगवेगळया क्षेत्रामध्ये आपले कतशत्व सिध्द करण्यासाठी स्त्री शिक्षणाचे महत्व नमुद केले. १९५२—५३ मध्ये स्थापन झालेल्या माध्यमिक शिक्षण आयोजाने देखिल स्त्री शिक्षणाच्या संदर्भात शिफारशी मांडल्या. डॉ. ए.एल.मुदलियार यांच्या



Scanned by CamScanner

अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या आयोगाने अभियांत्रिकी, कृषी, वैद्यकीय व वाणिज्य विभागामध्ये महिलांना दाखल करण्यावर भर दिला. मात्र महिला शिक्षणाच्या विकासामध्ये विशेष अशा कोणत्याही योजनेची आखणी हा आयोग करू शकला नाही. माध्यमिक शिक्षण आयोगानंतर १९५८ मध्ये खास स्त्री शिक्षणाचा मुद्दा समोर ठेवून दुर्गाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली.या समितीने पुढील सूचना केल्या.

१. स्त्री पुरूषांच्या शिक्षणातील वाढती दरी कमी करण्याची गरज आहे.

२. मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी अधिक निधी देण्यात यावा.

३. राज्यसरकारांनी स्त्री शिक्षणाच्या समस्यांवर काम करणारा विशेष विभाग स्थापन करावा.

४. अधिकाधिक स्त्री शिक्षिकांची नियुक्ती करण्यात यावी.

५. उच्च माध्यमिक स्तरावर मुलींसाठी स्वतंत्र शाळा असाव्यात.

६. आवश्यकता असेल तर लेखन साहित्य व गणवेशाचे मोफत वाटप करावे.

७. वसतिगश्ह बांधण्यास तातडीने सुरूवात करावी या सारख्या सूचना या समितीने केल्या. पुढे दुर्गाबाई देशमुख समितीच्याच शिफारशींच्या आधारावर सरकारने १९५९ मध्ये हंसा मेहता या समितीची स्थापना केली. या समितीने लिंगाधारित वेगवेगळा अभ्यासक्रम तयार करण्यात कुठलाच तार्कीक आधार नसून समितीने समान अभ्यासक्रमाची सूचना केली. व्यवसायिक अभ्यासक्रम आणि गश्हशास्त्रे हे मुली आणि मुले दोघांनाही शिकविण्याची महत्वपूर्ण सूचना देखिल याच समितीने केली. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणव्यवस्थेचा आढावा घेऊन शिक्षणाचे ध्येय धोरण ठरविण्यासाठी १९६४ मध्ये डॉ.डी.एस.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. स्त्री शिक्षणाच्या बाबतीत विचार मांडताना स्त्रीची भूमिका चूल आणि मूल सांभाळण्याच्या पुढे गेली असून समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये पुरूषांप्रमाणेच स्त्रिया वर्ग क्षेत्रामध्ये वाटा उचलत आहेत. मुलींना विशिष्ठ क्षेत्र करिअर म्हणून निवडण्यास भाग न पाडता त्यांना वैद्यकीय तसेच तंत्रज्ञानासारख्या क्षेत्राचेही करिअर निवडण्यास प्रोत्साहन देण्याची गरज या आयोगाने व्यक्त केली. दुर्गाबाई देशमुख आणि हंसाबाई मेहता यांनी केलेल्या शिफारशींना या आयोगाने पाठींबा दिला. विसाव्या शतकामध्ये महाराष्ट्रामध्ये सामाजिक आर्थिक राजकीय सांस्कशतिक परिवर्तन होत असताना शिक्षणाचा व त्यातून स्त्री उध्दाराचा झालेला प्रयत्न आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्वपूर्ण ठरला.

**संदर्भ :**

१) देहाडराय, स्वा. तांबे अ. (२००९). स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण, पुणे: क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ.

२) तांबोळी, श. (२००९). महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास. पुणे : डायमंड पब्लिकेशन..

३) भागवत, वि. (२००४) स्त्री प्रश्नाची वाटचाल. पुणे: प्रतिमा प्रकाशन.

४) सोनवणे,व्ही.वाय.आणि भालेराव,सु. (२०१४). महिला आणि मानवी हक्क, जळगाव:प्रशांत पब्लिकेशन.

५) झा, डी.एन.(२००६), प्राचीन भारत एक ऐतिहासिक रूपरेखा, पुणे: के.सागर पब्लिकेशन.

❑❑❑



Scanned by CamScanner